# दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि.

(मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)

**रजिस्टर्ड ऑफिस :** 'कॉसमॉस टॉवर', प्लॉट नं. ६, स.नं. १३२/बी, आयसीएस कॉलनी,
युनिव्हर्सिटी रोड, गणेशखिंड, पुणे-४११ ००७.

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस (फक्त सभासदांकरिता)

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. च्या सभासदांची ११८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शुक्रवार दि. २८ जून २०२४ रोजी सायं. ५.३० वाजता हॉटेल सेंट्रल पार्क, १२६५, आपटे रोड, हॉटेल रामी ग्रँड समोर, पुणे-४११००४** येथे होणार आहे. त्यावेळी पुढील कामकाज होईल. तरी सदर सभेस आपण अवश्य उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**सभेपुढील विषय :**

**१.** दि. १० जुलै २०२३ रोजी झालेल्या ११७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा व दि. ३० डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचा वृत्तांत कायम करणे.

**२.** अ) पुढील प्रस्तावांचा विचार करणे व त्यास मान्यता देणे.
   १. आर्थिक वर्ष २०२३-२०२४ चा वार्षिक वृत्तान्त.
   २. दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचे नफातोटा पत्रक.
   ३. दि. ३१ मार्च २०२४ रोजी संपलेल्या वर्षाचा ताळेबंद.
   ब) २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील गंगाजळी व इतर निधींच्या प्रत्यक्ष वापरासंबंधी माहिती घेणे.

**३.** संचालक मंडळाने सुचविलेल्या २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या नफा विभागणीसंबंधी विचार करणे व त्यास मान्यता देणे.

**४.** आर्थिक वर्ष २०२३-२०२४ च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालावर विचार करणे.

**५.** रिझर्व्ह बँकेच्या मान्यतेनुसार, २०२४-२०२५ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षकांची नियुक्ती करणे. त्यांचे मानधन ठरविण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.

**६.** बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक यांचेकडे २०२३-२०२४ या आर्थिक वर्षात येणे बाकी असलेल्या कर्जांची माहिती घेणे. (मल्टिस्टेट को-ऑप. सोसायटीज् अॅक्ट २००२ कलम ३९ (३) अनुसार).

**७.** बँकेच्या सध्याच्या पोटनियमांमधील दुरुस्त्यांबाबत संचालक मंडळाने केलेल्या शिफारशींचा विचार करणे व त्यास मान्यता देणे. (रिझर्व्ह बँक व सेंट्रल रजिस्ट्रार, नवी दिल्ली यांचे मंजुरीस अधीन राहून)

**८.** ११८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू न शकलेल्या सभासदांची अनुपस्थिती मान्य करणे.

**९.** मा. अध्यक्ष यांच्या संमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून,

**दिनांक** : ८ जून २०२४
पुणे

**सौ. अपेक्षिता ठिपसे**
**व्यवस्थापकीय संचालिका**

### सूचना

**१.** वरील सभेस सायं. ठीक ५.३० वाजता प्रारंभ होईल. त्यासाठी आवश्यक गणसंख्या पूर्ण झाली नसेल तर ही सभा स्थगित केली जाईल. अशा स्थगित सभेचे कामकाज त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सायं. ६.०० वाजता सुरू होईल व या स्थगित सभेस गणसंख्या पूर्तीची आवश्यकता राहणार नाही. या सभेत वरील नोटीशीमध्ये नमूद केलेल्या विषयांचा विचार करण्यात येईल.

**२.** दि. २८ जून २०२४ रोजी होणाऱ्या वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधीची कागदपत्रे बँकेच्या मुख्य कार्यालयात शुक्रवार दि. २१ जून २०२४ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत पाहावयास मिळतील.

**३.** वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयांबाबत सभासदांना काही प्रश्न विचारावयाचे असल्यास ते लेखी स्वरूपात बँकेच्या मुख्य कार्यालयामध्ये शुक्रवार दि. २१ जून २०२४ पर्यंत कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० या वेळेत आणून द्यावेत, ही विनंती.

४. बँकेचा २०२३-२०२४ या आर्थिक वर्षासाठीचा संपूर्ण अहवाल बँकेच्या संकेत स्थळावर (www.cosmosbank.com) उपलब्ध आहे. तथापि, सभेपूर्वी जे सभासद संपूर्ण अहवाल मिळण्याची लेखी मागणी करतील, त्यांना बँकेचा संपूर्ण अहवाल संबंधित शाखेमार्फत उपलब्ध करुन देण्यात येईल.

**५.** सभेस येताना सभासद ओळखपत्र कृपया जरूर सोबत आणावे. ज्या सभासदांनी असे सभासद ओळखपत्र शाखेकडून अद्याप नेले नसेल, त्यांनी संबंधित शाखेकडे त्यासाठी संपर्क साधावा.

### सभासद पात्रता निकष - जाहीर सूचना

**बँकेच्या पोटनियम क्र. ७ (iv)(b) अनुसार, सभासदाने सलग दोन वर्षे बँकेच्या पोटनियम क्र. ४ (xxix) (a) मध्ये नमूद केलेल्या सेवा सुविधांचा लाभ घेतला नसल्यास सदर व्यक्ती सभासद म्हणून अपात्र होईल. बँकेच्या पोटनियम क्र. ४ (xxix) (a) अनुसार आपले सभासदत्व कायम राहण्यासाठी प्रत्येक सभासदाने बँकेतील त्यांच्या बचत वा चालू खात्यांमध्ये किमान ` ५,०००/- सरासरी तिमाही शिल्लक ठेवणे आवश्यक आहे किंवा सभासदाने किमान ` ५,०००/- मुदत ठेव ठेवणे वा किमान ` ५,०००/- कर्ज घेणे आवश्यक आहे. तरी सर्व सभासदांना सूचित करण्यात येते की ज्या सभासदांनी या बाबींची पूर्तता केली नसेल अशा सभासदांनी सदर बाबींची त्वरीत पूर्तता करावी अन्यथा ते सभासद म्हणून अपात्र ठरतील.**